# जळगांव स्कॅंडलाच्या निमित्ताने

**महाराष्ट्र टाइम्स**
**दिनांक : ०५.०९.१९९४**

गेले दोन महिने दररोज गाजत असलेल्या जळगांव स्कॅंडल मधे दोन महत्वाचे टप्पे पार पडून गेले आहेत. या निमित्ताने या स्कॅंडल मधील घटना व पुढील संभावनांचा विचार करणे आवश्यक वाटते.

एकीकडे महिला धोरणाची घोषणा होत असतांना, व महिलांकरिता काहीतरी भरीव घडू पहात असतानाच जळगांवचे सेक्स स्कॅंडल उघडकीस आले आणी सामान्य जनता गांगरून गेली. आपल्या समाजाच खर चित्र कोणत? हे- जे घडू पहातय, की ते - जे प्रत्यक्ष घडून गेलेल आहे? विद्यालयीन, महाविद्यालयीन तरुणी व घर संसारात स्थिरावलेल्या महिलांचे सुध्दा अश्लील फोटो काढून त्याद्वारे त्यांना व पालकांना ब्लॅकमेल करणा-या टोळींची वर्णने ऐकू येऊ लागली, यात अडकलेल्या स्त्रियांची घोषित आकडेवारी फुगुन पाचशेपर्यंत गेली. त्याच वेळी जळगांवच्या डीएसपींची बदली झाल्याने एक वेगळाच गदारोळ उठला. शेवटी शासनाने अगोदर तीन वरिष्ठ स्त्री अधिका-यांना पाठवून व नंतर सीआयडी चे एक खास पथक नेमून या प्रकरणी उसळलेला लोकक्षोभ थोडासा थांबवला. त्यानंतर आता सीआयडीच्या टास्क फोर्सची चौकशीपण संपली आहे, न्यायालयाच्या व पोलीस चौकशीच्या इतर प्रकिया नेहमीप्रमाणे पुढे चालू रहातील. त्या तीन वरिष्ठ स्त्री अधिका-यांमधे एक मी पण होते.

या निमित्ताने जे कित्येक मुद्दे मला जाणवले, त्यातील पहिला मुद्दा आहे सामाजिक संवेदनांचा - जी दिसून आली ती व जी दिसली नाही तीही. १८ जून पासून या विषयी बातम्या दररोज पेपरला येत असून सुध्दा याचा जाहीर निषेध किती उशीरा झाला? तो देखील समर्थपणे झाला, तो फक्त जळगांव शहरात, इतर कुठेतरी अगदी छोटे मोर्चे. नाशिक, धुळे, औरंगाबाद सारखी शेजारची मोठी शहरं तर अजूनही झोपलेलीच - समाजातील भयानकता आपल्यापर्यंत पोचत नाही तोवर कशाला काय बोलायचे अशी भूमिका बाळगलेली. मुंबईत राजकीय मोर्चे सतत निघत असतात. पण जळगांव प्रकरणाच्या धिक्कारासाठी किती मोर्चे निघाले? अशा थंड वातावरणांत वाखाणण्यासारख्या तीन गोष्टी घडल्या. पहिली म्हणजे वासनाकांडात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कोणत्याही आरोपीसाठी आम्ही जामीन रहाणार नाही हा जळगांवच्या मुस्लिम समाजाने घेतलेला निर्णय. दुसरा या प्रकरणांत अडकलेल्या मुलींची नावे गुप्त ठेवण्यावद्दल पत्रकारांनी दाखविलेला संयम. तसेच या वासनाकांडात अडकलेल्या मुलींवरोबर लग्न करायची तयारी काही तरूणांनी दाखवली आहे ही पण एक आशादायक गोष्ट आहे.

जळगांव किंवा लातुर भूकंपासारखी घटना जेंव्हा घडते तेंव्हा समाजात दोन त-हेच्या प्रकिया सुरू होऊ शकतात. एक लोकांनी तत्काळ आपली संवेदना नोंदविणे. या संवेदनेतून समाजाची मूल्ये दिसून येतात. जळगांवच्या नगराध्यक्षांनी अत्याचारित मुलींबद्दल सहानुभूति व्यक्त न करता ज्यांचा न्यायालयात गुन्हा सिध्द झाला नाही ते दोषी कसे? असा सूर लावला. मुद्दा म्हणून हे बरोबर आहे- पण त्यातून त्यांची प्रायोरिटी काय- त्यांना जास्त काळजी कशाची ते दिसून आले. त्या उलट आरोपीना जामीन रहाण्याचे नाकारणारा मुस्लिम समाज किंवा उपोषण कर्त्या महिलांनी वेगळ्या समाजमूल्यांचे दर्शन घडवले. या दोन्ही घटना 'संवेदना नोंदविणे' या सदरात मोडतात.

एखाद्या घटनेची जेवढी तीव्रता आपल्याला वाटली तशी ती इतंराना पण वाटावी यासाठी हे संवेदना नोंदवणे ठीक आहे. पण पुढे काय? जळगांव सारख्या घटनेने रक्त उसळून येणे जितके गरजेचे आहे तेवढेच

नंतराच्या काळांत शांत डोक्याने पुढील विचार करता येणे गरजेचे आहे. आज गुन्हेगारांना तातडीने शिक्षा होतांना दिसत नसेल तर नेमके काय केले असता तसे होईल- त्यासाठी कायदेकानून व तपासाच्या पध्दतीत काय बदल करावे हा विचार उसळत्या रक्ताने नाही तर शांत डोक्याने व्हायला पाहिजे. पण समाजात हा पुढचा विचार होताना दिसून आला नाही. जळगांवच्या अनुषंगाने कित्येक गोष्टी होऊ शकल्या असत्या ज्या झाल्या नाहीत. पंडित सपकाळेला पकडावे म्हणून आग्रह धरण्यांत आता पण त्याला किंवा ज्या इतर नगरसेवकांविरूद्ध न्यायालयाने सुध्दा जामीन नाकारला आहे, म्हणजेच सकृतदर्शनी ज्यांचा दोष दिसून आला आहे त्यांचे नगरसेवकत्व निदान तात्पुरते तरी रद्द करा ही मागणी होऊ शकली असती. त्यांचे आर्थिक व्यवहार जाहीर करायची मागणी करता येऊ शकते का? यावद्दल चर्चा होऊ शकली असती. कारण आरोपींपैकी कित्येकांची गुर्मी पैसा व सत्ता यातून आलेली आहे. या कांडात काही डाक्टर्स व वकील देखील गुंतले होते, त्यांचे रजिस्ट्रेशन किंवा सनद तात्पुरती रद्द करण्याची मागणी होऊ शकली असती. अजूनही होऊ शकेल, पण झालेली नाही.

या कांडात अडकलेल्या सर्व नाही तरी काही मुलींनी पोलीसाकंडे तक्रार नोंदवली आहे. जर त्यांच्यापैकी कुणी जाहीरपणे पुढे आली तर समाज तिच्या धाडसाबद्दल तिला हार-तुरे, शौर्यपदक इत्यादी देईल? या अत्याचारित मुलींना असे वाटते की समाज त्यांच्याकडे एक वाईट मुलगी, विशेषतः भविष्यातही इतरांना वापरण्यासाठी उपलब्ध होऊ शकणारी मुलगी या नजरेने पाहील आणि त्या निंदेला तोंड देणे त्यांना जड जाईल. अशा मुलींना दिलासा किंवा समाजाबद्दल विश्वास वाटावा म्हणून काय करता येऊ शकते याबाबत चंर्चासत्र व्हायला हवीत. ती पण होतांना दिसत नाहीत.

या निमित्ताने इंडियन एव्हिडन्स ॲक्टचा व न्याय प्रक्रियेचा पण विचार व्हावा. आपल्या व पाश्चात्य देशांच्या सामाजिक मूल्यांमधे एक मोठा फरक हा आहे की, आपल्याकडे कुटुंब हा आपल्या अस्तित्वाचा केंद्रबिंदु मानला जातो. लग्नाशिवायची मुलगी आपल्या समाजाला चालत नसते. आणि कौर्मायभंग झालेली मुलगी आपल्याला लग्नांत चालत नसते. पाश्चात्य देशांत एखाद्या मुलीवर बलात्कार झाला तर पुढे दोन-चार वर्षानी त्या मुलीबरोबर लग्नाचा विचार करणारा मुलगा मागील बलात्काराच्या कारणास्तव तिच्याबरोबर लग्न नाकारत नसतो. त्यामुळे अशी मुलगी कोर्टापुढे साक्ष द्यायलाच तयार नाही असे होत नाही. क्वचित् नाहीच तयार झाली तर इतर कारणासांठी - पण माझा पुढचा संसार कसा होईल या काळजीमुळे नाही. भारतात मात्र अत्याचारित मुलींच्या मनांत ही पहिली भिती असते. अशा वेळी आपल्या साक्षी पुराव्याच्या पध्दतीत बदल करण्याची गरज नाही काय ? पुरुषांने बलात्कार केला किंवा तो बलात्कार करू शकण्याच्या स्थितीत होता असे जेंव्हा इतर परिस्थितीजन्य बाबींमधून दिसून येत असेल तेंव्हा केलेला संभोग बलात्कार नव्हता हे सिध्द करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली पाहिजे. तसेच जर तो आपण बलात्कार केला हे कबूल करत असेल तर मुलीची साक्ष न काढता देखील त्याच्यावरील न्यायालयीन प्रकिया पूर्ण करता आली पाहिजे. इंडीयन एव्हिडन्स ॲक्टमधे बदल करून आपण इन कॅमेरा ट्रायलची कलमे कायद्यांत समाविष्ट केली. पण त्याबद्दल जळगांव सारख्या शहरातील लोकांना विशेष माहिती नव्हती. तसेच या पध्दतीमुळे त्या स्त्रियांबाबत पूर्ण गुप्तता राखली जाऊ शकते का, आणि कशी या बाबत लोकांना विश्वास नव्हता. हे लोकशिक्षण निरनिराळ्या बार कौन्सिल्सना, शासनाच्या महिला कल्याण, किंवा न्याय विभागाला किंवा नाशिक मुक्त विद्यापीठाला किंवा विद्यापीठातर्फे एखाद्या न्यायशास्त्राच्या प्राध्यापकाला करता येईल. हे ही व्हायला हवे.

आपली पोलीस व्यवस्था व न्याय व्यवस्था याची लोकांना एवढी भिती वाटते की, नको ते पोलीस व नको कोर्ट त्यापेक्षा झालेला बलात्कार परवडला अशी कित्येक मुलींची व त्यांच्या पालकांची भावना झाली होती. न्याय प्रकीयेला जो वेळ लागतो, त्यामुळे त्या न्यायदानाचे उद्दिष्टच कित्येक वेळा संपून जाते. हा उशीर कां लागतो ? याची क्वचित् व किंचित् चर्चा न्यायाधीश मंडळींच्या काही चर्चासत्रांत होते. पण त्यात लोकांचा

सहभाग कधीच नसतो. न्यायालयांना योग्य त्या बिल्डींग्स नाहीत, पुरेसे न्यायाधीश नाहीत, रेकार्ड जपून ठेवण्यासाठी चांगले रेकार्डरूम नाही- त्यामध्ये मायक्रो फिल्मिंग, झेरॉक्स इत्यादि आधुनिक फॅसिलिटिज नाहीत. खटले वर्षानुवर्षे रेंगाळतात. सतत अपील्स व सतत केसेस रिमांड होत असतात. स्टे दिले जाऊन वर्षानुवर्षे केस पडून रहाते. यदाकदाचित ती निकाली निघाली तर अंमलवजावणी होण्याला वेळ लागतो. यात सुधार कसा होईल आणि न्यायालयांची विश्वासार्हता कशी वाढेल याबाबत चर्चासत्र व्हायला हवीत. खास न्यायालये नेमून एखाद्या केसची तड लागेल असं लोकांना वाटत. पण कित्येक वेळा असा अनुभव येतो की, खास न्यायालयाची घोषणा झाल्यानंतर प्रत्यक्ष नेमणूक होऊन अशा न्यायालयाची कार्यकक्षा व अधिकारांची मर्यादा ठरविणे, त्यांच्यासाठी इमारत उपलब्ध होणे, इतर स्टाफ नेमले जावून त्यांनी प्रत्यक्ष कामावर रूजु होणे, एवढे उरकायलाच किती तरी वेळ जातो. शिवाय अशा खास न्यायालयांच्या अधिकाराला चॅलेंज करून अंतुले यांच्या सारखा एखादा माणूस सुप्रीम कोर्टापर्यंत आपली केस वर्षानुवर्षे रेंगाळात ठेवू शकतो. त्यामुळे खरे तर खास न्यायालय नेमणे ही तात्पुरती मलमपट्टी झाली. खरा उपचार म्हणजे न्यायप्रकियेतील विलंब कणखरपणाने कमी करणे हाच होय. यासाठी प्रशासकीय व्यवस्था जेवढी महत्वाची तेवढेच वकिलांचे निरर्थक फसवे युक्तीवाद बाजूला ठेवून प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यासाठी न्यायालयीन शिस्त आणि सुटसुटीतपणा देखील आवश्यक आहे. हया सुधारणांच्या बाबत सखोल चर्चा समाजात होत नाही तो पर्यंत कार्यक्षम न्यायपध्दती मिळू शकणार नाही आणि तोपर्यंत समाजाच्या मनातील न्यायप्रकिये बाबतचा निरुत्साह कमी होणार नाही. तो पर्यंत लोकशाहीला धोका कायम राहील.

जळगांव स्कॅंडल मध्ये किती मुली. किती पुरुष माणसे व किती सूत्रधार गुंतले आहेत, किती फोटो, किती ब्ल्यू फिल्मस् निघाल्या आहेत, या बाबत एक फुगीर आकडेवारी आधी प्रसिध्द झाली. नंतर नवीन डीएसपी आले व घोषित आकडेवारी एकदम खाली आली. यामुळे लोकांच्या मनांत जे संशयाचे वातावरण निर्माण झाले ते कधीही पुसले जाणे अशक्य. त्यांत कोणी काय केले हा प्रस्तुत लेखाचा विषय नाही. पण त्या निमित्ताने शासकीय पारदर्शकतेचा विषय नक्कीच चर्चिला जाऊ शकतो. आज शासनाच्या वेगवेगळ्या यंत्रणेत पण विशेष करून पोलीस यंत्रणेत लोकांचा सहभाग आवश्यक वाटतो. एखादी त्रस्त मुलगी पोलीसांकडे फिर्याद द्यायला आली तर तिला निदान मोकळेपणाने बोलता येईल, प्रसंगी तिला गरज लागली तर कोणी तरी तिच्या पाठीवर हात ठेऊन धीर देऊ शकेल असे वातावरण असले पाहिजे. जळगांव स्कॅंडलमध्ये आधी एकही स्त्री तक्रार द्यायला पुढे येत नव्हती. मात्र जळगांवमधे आमची म्हणजे स्त्री अधिका-यांची टीम गेल्यानंतर माझ्याकडे मुलींचे किंवा त्यांच्या वतीने अर्ज येऊ लागले आणि सीआयडी ने खास महिला पोलीसांची नेमणूक केल्यानंतरच व नेमलेल्या सीआयडी पथकातील अधिका-यांची विश्वासार्हता खूप असल्यामुळेच, शिवाय त्यात बोरवणकर यांच्यासारखी स्त्री अधिकारी असल्यामुळेच स्त्रिया माहिती  द्यायला पुढे आल्या. सांवतवाडीत दिसलेले चित्र या तुलनेने किती तरी आशादायक होते. तिथे डीएसपी यांनीच ही केस पुढे आणण्यामध्ये व त्यांतील मुलींना दिलासा देण्यामध्ये जातीने लक्ष घातले. उद्या सांवतवाडी मध्ये पुनः अशी दुसरी केस झाली तर पोलीसांच्या बद्दल विश्वास बाळगून त्या मुली तक्रार करतील. ही विश्वासार्हता समाज गृहीत धरत नाही. एखाद्या प्रसंगाने ती निर्माण झाली तरी पुढे बराच काळ टिकवून ठेवायची असेल तर शासनाला वेळोवेळी समाजापुढे आपल्या चांगल्या कामाचे उदाहरण ठेवावे लागते. जळगांव येथे मागे घडलेल्या एका घटनेत अशीच एक बलात्कारित स्त्री फिर्याद द्यायला पुढे आली व थोडया कालांतराने ती जळून मेली. याही घटनेचा तिथल्या स्त्रियांच्या मनावर पगडा होता. त्यामुळे अत्याचारित मुलींच्या मनात तीन वेगवेगळया प्रकारची भिती आहे. या प्रकरणांत गुंतलेली कांही मंडळी सत्तास्थित असल्याने त्यांच्या वतीने आपल्याला शारिरिक इजा केली जाईल ही पहिली भिती. कोर्टात ही केस गेली तरी कधी संपेल, किती रेंगाळेल आणि अपराध्यांना नक्की शासन होईल कां, की त्यांना वाचवण्याचे प्रयत्न केले जातील ही दुसरी भिती. समाज आपल्याकडे वेगळया नजरेने पाहील ही सर्वांत मोठी

भिती. तक्रारी देणा-या कित्येक मुली अविवाहित आहेत. कांही प्रसंगी त्यांच्या घरच्या मंडळींना या प्रकारांची पूर्ण जाणीव आहे. पण ते घरही काही झाल तरी माहेर आहे, हा स्पष्ट फरक स्त्रियांच्या मनात होता. ज्या मुलींची लग्न झालीत, ज्यांना एक-दोन मुल आहेत अशांनी कृपा करून आमच्या घरी येऊ नका, आमच्या नव-याला, सासरी, हे कळू देऊ नका अशी चौकशी अधिका-यांकडे विनंती केली. अन्याय सहन करून गप्प बसणेच या स्त्रियांना का योग्य वाटले, व ही सामाजिक परिस्थिति बदलता येईल का यावर जास्तीत जास्त चर्चा व्हायला हवी.

या साठी आजची व्यवस्था काय आहे ? गुन्हा घडल्यानंतर पोलीसाकडेच रिपोर्ट केला पाहिजे- हे खरे तर बंधन नाही - एखाद्या न्यायाधीशाकडे देखील तक्रार करता येते. शिवाय आजच्या तपासाच्या पध्दतीत सुधारणा होऊ शकते. विशेषतः अत्याचारित स्त्रियांबाबत तपासणी करतांना त्या त्या भागातील एखादी दोन-तीन स्त्रियांची समिती त्या तपासामध्ये सुरवातीपासून शेवटपर्यंत सहभागी असणे उपयोगी पडू शकते. इतर पुढारलेल्या देशांत खटला चालण्याच्या काळात जी ज्यूरींची सिस्टम आहे तशी सिस्टम, तपासणीच्या काळातली सिस्टम, हे व असे कित्येक मुद्दे चर्चेत घ्यायला हवेत.

नवीन पिढीतील तरुणांनी, आणि ३५ वर्षापर्यंतच्या वयोवटातील विवाहित तरुणांनी या चर्चासत्रांमध्ये पुढाकार घ्यायला हवा. त्यांचे मत समाजापुढे मांडायला हवे. या समाजाचे भवितव्य त्यांच्याच भूमिकेवर व त्यांच्याच कामगिरीवर अवलंबून आहे त्यामुळे अत्याचारित किवा अन्य तरुण मुलींनी धाडसाने पुढे यावे हे आवाहन जेवढे गरजेचे आहे तेवढेच तरुण मुलांनी देखील समाज सुधारणेसाठी पुढे यावे हे ही आवाहन गरजेचे आहे. ते मी या निमित्ताने करू इच्छिते.

---